अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या अ.वि.नी.
प्रवेश बाबत मा. याचिका क्र. ४४३७/०६
मा. राष्ट्रीय [illegible] न्यायालय श्री. [illegible]
यांच्या दि. २८/७/०६ च्या निर्णयानुसार
कारवाई करावी.

जा.क्र.प्राअवि/एनसीटीई/२००६-०७/३४-ट/७५७
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, पुणे ३०
दिनांक : १० / २ /२००७

प्रति,

प्राचार्य/सचिव,
संत तेरेसा इन्स्टि. कॉलेज ऑफ एज्यु.
एस.व्ही रोड सांताक्रुझ मुंबई

विषय :- <u>सन २००६-०७ या वर्षाकरिता नवीन अध्यापक विदयालय / अतिरिक्त तुकडीस कायमविना अनुदानित तत्वावर मान्यतेबाबत...</u>

संदर्भ :- १) एन.सी.टी.ई. भोपाळ यांचे पत्र क्र. डब्ल्यूआरसी/अेपीडब्ल्यू/12372(E.) 113132
दिनांक १७-१२/२४-१२/२८-१२/३०-१२-२००६
२) शासन पत्र दिनांक ०९-०१-२००७.
३) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग यांचे तपासणी / पडताळणी आदेश दिनांक १८-१०-२००६ / २७-११-२००६ /०९-०१-२००७

एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेत नवीन अध्यापक विद्यालय सुरु करण्यासाठी काही अटी आणि शर्तींच्या अधीन राहून सन २००६-०७ पासून नवीन अध्यापक विद्यालयास / अतिरिक्त-तुकडीस परवानगी देण्यात आलेली आहे. अटी व शर्ती पुढीलप्रमाणे असतील त्यांचे काटेकोरपणे पालन अ.वि. च्या व्यवस्थापनाने करावे, त्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१) एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या निकषांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.
२) विहित अर्हताधारक व अनुभवी प्राचार्य व अध्यापक यांची महाराष्ट्र शासनाच्या निकषानुसार व म. खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार नेमणुका कराव्यात.
३) नेमलेल्या सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विभागीय शिक्षण उपसंचालक यांची मान्यता घेण्यात यावी.
४) प्रवेशाच्यावेळी प्रचलित शासन धोरणानुसार व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रवेश करण्यात येतील.
५) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक ते मार्गदर्शन घेतले जावे व त्यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.
६) अध्यापक विद्यालय विनियमन प्रधिकरण, पुणे (द्वारा - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - ३०) यांचेकडे दि. २८-२-०७ पूर्वी शुल्क निश्चितीबाबतचा प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेमार्फत सादर करावा.
७) नियमाप्रमाणे अनुज्ञेय व्यवस्थापनाच्या जागा भरण्यास आपणास या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे.
८) व्यवस्थापन कोटा भरताना कोणतेही शासकीय नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता

घ्यावी. व्यवस्थापन अगर शासकीय कोटयातील प्रवेश देताना कोणांही उमेदवारांकडून डोनेशन/ देणगी अथवा निर्धारीत शुल्कापेक्षा जादा शुल्क घेतले जाणार नाही याची काळजी घेतली जावी. याबाबत कोणतीही तक्रार आल्यास महाराष्ट्र कॅ.फी ॲक्ट १९८७ मधील कलमांच्या तरतुदीनूसार संबंधित अ.वि./व्यवस्थापनावर कारवाई केली जाईल.

९) दरवर्षी एन.सी.टी.ई. ला स्टाफ प्रोफाईल विहित नमुन्यात संचालकांच्या प्रतिस्वाक्षरीसह सादर करण्यात यावेत.

१०) महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेला अभ्यासक्रम, मूल्यमापन पध्दती, प्रात्यक्षिक कार्य इ. बाबींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असेल.

११) चालू शैक्षणिक वर्ष २००६-०७ मध्ये एन.सी.टी.ई. ने आपल्या अध्यापक विद्यालयास / वाढीव तुकडीस अत्यंत विलंबाने म्हणजेच विभागस्तर आणि राज्यस्तर केंद्रीय प्रवेश प्रक्रिया चालू असताना / संपल्यावर मान्यता कळविलेली असल्याने आपला अध्यापक विद्यालयात केंद्रीय प्रवेश विभाग स्तर व राज्यस्तरावरून करण्यासाठी प्रवेश प्रक्रिया शुल्क प्रति तुकडी प्रमाणे शासनाच्या आदेशाप्रमाणे द्यावे लागेल. (शासनादेश दिनांक ०९-०१-२००७).

१२) आपल्या अध्यापक विद्यालयास विलंबाने परवानगी मिळालेली असल्याने शासन नियमानुसार २१० कार्यदिन पूर्ण करणे आवश्यक आहे.

१३) शासनपत्र दि. ९-१-२००७ मध्ये क्र. ४ वर दिलेल्या सूचनेचे तंतोतंत पालन व्हावे. हमीपत्राचा सोबत दिलेल्या नमुन्यात रू.१००/- च्या स्टॅम्पवर लेखी हमीपत्र दिले जावे. ते प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचेकडे जमा करावे.

### अध्यापक विद्यालयाचा तपशील

| संस्थेचे नाव व एन.सी.टी.ई. कोड नं. | अध्यापक विद्यालयाचे नाव व ठिकाण (पत्ता) | माध्यम | प्रकार | प्रवेश क्षमता | मान्यतेचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| संत तेरेसा अध्या. कॉलेज ऑफ एज्यु. 122372 | संत तेरेसा कॉन्व्हेंट सांताक्रुझ मुंबई | इंग्रजी | मिश्र | ५० | ०६-०७ |

टीप : कॉलम ११ मध्ये नमूद केलेनुसार शासनाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने आपण रू.२५,०००/- चा धनादेश राज्यस्तरीय डी.एड. प्रवेश निवड निर्णय तथा नियंत्रण समिती यांचे नावे द्यावा. सदरचा धनादेश प्राचार्य डाएट यांचेकडे जमा करावा.

संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३० करिता.

स्थळप्रत मा. संचालकांचे स्वाक्षरीत.

प्रत :

१) मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, -मुंबई- विभाग -मुंबई--- यांना कार्यवाहीसाठी.

३) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, -शिक्षण निरिक्षक- यांना पुढील कार्यवाहीसाठी.

४) संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे १.